**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दुरध्वनी क्र. ०२२-२२८१२२७३ ई-मेल- madhavi.shinde@nic.in

क्रमांक:- संकीर्ण-१५२६/प्र.क्र.०८/२१-स दि.: २३ जानेवारी, २०२६.

प्रति,

कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे (MSAMB)

**विषय:- मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्वायत्त संस्था इ. मधील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता गुणांकन कार्यक्रम राबविण्याबाबत...**

संदर्भ:-१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/कार्या १२ (सेवा), दि.०९.०६.२०२५ व दि.१६.०९.२०२५ चे शासन निर्णय.
२. शासनाचे समक्रमांकाचे दि.०९.०१.२०२६ चे पत्र.

महोदय,

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये,स्थानिक स्वराज्य संस्था,मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग इ. संस्थांचे सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत गुणांकन करण्याच्या सूचना संदर्भाधीन दि.०९.०६.२०२५ मधील शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून प्राप्त माहितीच्या आधारे, प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्या मान्यतेने सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत पणन मंडळास दिलेले गुणांकन सोबत जोडले आहे.

सदर गुणांकन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

आपली,

(माधवी सं. शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र-वरीलप्रमाणे

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०९/०६/२०२५ च्या शासन निर्णयातील विवरण पत्र - ३ नुसार माहिती**

| अ.क्र. | तपशिल | गुण | शेरा | दिलेले गुण |
|---|---|---|---|---|
| १. | आकृतीबंध | १० | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे सेवक आकृतीबंधास शासनाने दि.१७/०२/२०२० च्या पत्रान्वये मंजुरी दिलेली आहे. सोबत मंजुर आकृतीबंध जोडलेला आहे. आकृतीबंध पणन मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. | १० |
| २. | सेवा प्रवेश नियम | १० | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची स्थापना महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील तरतुदीनुसार २३/०३/१९८४ रोजी झालेली आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने शासन नियमा आधारित स्वतंत्रपणे सेवक सेवा नियम तयार केलेले आहेत. | १० |
| ३. | सर्व संवर्गाची अद्ययावत जेष्ठतासुची प्रसिध्दी | १० | जानेवारी २०२५ मध्ये १८ संवर्गाची माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे. | १० |
| ४. | पदोन्नती | १० | मंजुर सेवक आकृतीबंधानुसार पदोन्नतीची रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. पदोन्नतीबाबतच्या रिक्त पदांचा तपशिल सोबत जोडण्यात आलेला आहे. रिक्त पदाची टक्केवारी १९%आहे. | ०८ |
| ५. | सरळसेवा भरती | ४ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे सेवक आकृतीबंधास शासनाने दि.१७/०२/२०२० च्या पत्रान्वये मंजुरी दिलेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार बिंदु नामावली तपासणीचा प्रस्ताव मा. मागासवर्ग कक्ष, पुणे यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.मंजुरीअंती सरळसेवा भरतीबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे. रिक्त पदाची टक्केवारी ७९.१४%आहे. | ० |
| ६. | बिंदु नामावली | १० | सन २०१७ मध्ये करण्यात आलेली आहे. त्यास सामान्य प्रशासन विभागाची मंजुरी घेण्यात आली आहे. | ५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | अनुकंपा नियुक्ती | १० | अनुकंपा नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत एकही प्रकरण प्रलंबित नाही. | १० |
| ८. | iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन | १० | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्वायत्त संस्था असल्याने iGOT पोर्टल प्रणालीचा ॲक्सेस शासनाकडुन पणन मंडळास मिळालेला नाही. | -- |
| ९. | सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे व डिजीटल करणे. | २० | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्वायत्त संस्था असल्याने डिजीटल पोर्टल प्रणालीचा ॲक्सेस शासनाकडुन पणन मंडळास मिळालेला नाही. सबब ऑफलाईन पध्दतीने सर्व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तक अद्ययावत करण्यात आली आहेत. | २० |
| | एकूण गुण | १०० | | ७३/९० |